SCC No. 612/2026

Exh.1/C

समरि कि. के. नं. /2026

# मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो, पेठ वडगांव

यांचे कोर्टात

Digitally signed by SHRINIVAS ARUN KULKARNI
Date: 2026.06.02 14:57:24 +0530

आदर्श ग्रामीण सहकारी पतसंस्था मर्या.
सावर्डे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर } फिर्यादी

Order
Put up for Verification
JMFC Peth vadgaon

विरुद्ध

इकलास हामजुद्दीन मोमीन } आरोपी

दि. निगोशीएबल इंस्ट्रूमेंट ॲक्ट 1881
चे कलम 138 प्रमाणे फिर्याद

| | | |
|---|---|---|
| 1 | दैनिक रजि. नं | /2026 |
| 2 | आरोपीचे नाव | इकलास हामजुद्दीन मोमीन |
| 3 | धनादेश नं | 001469 |
| 4 | धनादेश रक्कम | 23,79,697/– |
| 5 | धनादेश दिलेली तारीख | 13/04/2026 |
| 6 | धनादेश बॅकेत भरलेली तारीख | 16/04/2026 |
| 7 | धनादेश परत आलेली तारिख | 18/04/2026 |
| 8 | नोटीस पाठविणेत आलेली तारिख | 20/04/2026 |
| 9 | नोटीस लागू झालेली तारीख | 22/04/2026 |
| 10 | फिर्याद दाखल तारीख | २८/05/2026 |

दैनिक रजि. नं.   / 2026

समरि क्रि. के. नं.   / 2026

फिर्याद दाखल ता.   / 05 / 2026

# मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो, पेठ वडगांव

**यांचे कोर्टात**

| | | |
|---|---|---|
| **आदर्श ग्रामीण सहकारी पतसंस्था मर्या.**<br>**सावर्डे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर तर्फे**<br>मॅनेजर श्री. शहाजी बाबासो जाधव –मगदुम, व व 51<br>रा. सावर्डे, ता. हातकणंगले जि. कोल्हापूर. | } | फिर्यादी |

विरुद्‌ध

| | | |
|---|---|---|
| इकलास हामजुद्‌दीन मोमीन<br>व.व. 40, धंदा : नोकरी<br>रा. सावर्डे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | } | आरोपी |

**दि. निगोशीएबल इंस्ट्रूमेंट ॲक्ट 1881**
**चे कलम 138 प्रमाणे फिर्याद**

**यातील फिर्यादी मे कोर्टास कळवितात ते खालीलप्रमाणे –**

1. यातील फिर्यादी आदर्श ग्रामीण सहकारी पतसंस्था मर्या. सावर्डे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर ही महाराष्ट्र को. ऑपरेटिव्ह सोसायटीज् ॲक्ट 1960 अन्वये अस्तित्वात आलेली सहकारी संस्था असून तिचा नोदणी क्र. के. पी. आर / एच् एल् इ / आर एस

Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon.

आर (सी आर)/1954/99 – 2000 आहे. फिर्यादी संस्थेचे नोंदणीकृत प्रधान कार्यालय सावर्डे, ता. हातकणंगले. जि. कोल्हापूर येथे आहे. फिर्यादी संस्थेचे कार्यक्षेत्र हे हातकणंगले तालुक्यापुरते मर्यादीत आहे. फिर्यादी संस्था ही तिचे सभासदांना गरजेनुसार कर्ज पुरवठा करणारी, बचत तसेच मुदत ठेवी स्विकारणारी संस्था आहे. फिर्यादी संस्थेतर्फे सदरील फिर्याद दाखल करणे, फिर्यादीवर सहया करणे, जाबजबाब देणे, कागदपत्रे गुदरणे, काढूण घेणे वगैरेबाबतचे सर्व अधिकार संस्थेतर्फे श्री. शहाजी बाबासो जाधव –मगदुम, श्री अमोल तानाजी शेळके, यांना फिर्यादी संस्थेची मिटींग ता. 09/05/2026 व मॅं. कमिटी ठराव नं. 04 या ठरावाने देणेत आलेले आहेत. सदरील ठरावास अनुसरुन फिर्यादीने सदरची फिर्याद दाखल केलेली आहे.

2. यातील आरोपी हा फिर्यादी संस्थेचा कर्जदार आहे. तसेच फिर्यादी संस्थेने आरोपीची आर्थिक गरज पूर्ण करणेचे हेतूने व आरोपीने फिर्यादी संस्थेकडे कर्ज मागणी अर्ज, स्टॅम्प, जामिन कतबा, कर्ज रोखा, प्रॉमीसरी नोट इत्यादी व कर्जासाठी लागणारी अन्य आवश्यक ती कागदपत्रांची पूर्तता करून फिर्यादी संस्थेचे सावर्डे शाखेकडून वाहन कर्ज दिनांक 22/06/2022 इ रोजी रक्कम रू. 24,25,000/– (अक्षरी रक्कम रु चोवीस लाख पंचवीस हजार रुपये फक्त) घेतलेले आहे. सदरील कर्जाची परतफेड करण्याची जबाबदारी घेवून तशी लेखी हमी फिर्यादी संस्थेला आरोपीने लिहून दिली आहे. सदरील कर्ज खातेवर आरोपीकडून व्याजासह दि. 15/04/2026 इ. रोजी अखेर रक्कम रु 25,16,046/– (अक्षरी रक्कम रु पंचवीस लाख सोळा हजार शेचाळीस रू. फक्त) इतकी कर्ज रक्कम थकबाकी होती व आहे. त्याप्रमाणे पुढील व्याज अशी येणे बाकी आहे. सदरील कर्जाउ रक्कमेची ठरलेप्रमाणे व कबूल केलेप्रमाणे आरोपी यांनी मुदतीत परतफेड केलेली नाही. सदरील कर्ज खातेवर जसजसे व्यवहार होतील तसतसे आरोपीचे कर्ज खाते ठेवले आहे.

3. यातील फिर्यादी हे आरोपी यांचेकडे सदरील कर्जाउ रक्कमेची ठरलेप्रमाणे मुदतीत हप्त्याची परतफेड केली नाही म्हणून वसूलीकरिता गेले असता आरोपी यांने कर्जाउ रक्कमेच्या थकबाकी पोटी रक्कम भरणेची तयारी दर्शवली. आरोपीने सदरील रक्कम कर्ज खातेवर रोखीने जमा न करता फिर्यादी संस्थेला कर्जाचे अंशतः परतफेडी पोटी

Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon.

दि. 13 / 04 / 2026 इ रोजीचा आर बी एल् बॅक शाखा पेठवडगांव येथील खाते नंबर 1000610010015748 वरील चेक / धनादेश नं. 001469 चा रक्कम रु 23,79,617 / — (अक्षरी रक्कम रुपये तेवीस लाख एकोणऐंशी हजार सहाशे सतरा रू. फक्त) चा धनादेश भरून सही करून दिला होता. सदर धनादेश देते वेळी यातील आरोपीने फिर्यादी संस्थेस दिलेला धनादेश हा मुदतीत बॅकेत भरलेस तो वटेल याची पुर्णपणे खात्री व हमी दिली होती.

4. आरोपीचे शब्दावर विश्वास ठेवून यातील फिर्यादी संस्थेने सदरील धनादेश स्विकारला. तद्नंतर सदरील धनादेश फिर्यादी संस्थेने दि. 16 / 04 / 2026 इ. रोजी फिर्यादी संस्थेचे खाते असले भारतीय स्टेट बॅक शाखा हातकणंगले या बॅकेत वटणेस भरला असता सदरचा धनादेश न वटताच "फंडस् इनसफिशिएंट" या शे–यानिशी दि. 18 / 04 / 2026 इ. रोजी परत आलेला आहे. सदरचा धनादेश व त्यासोबतचा रिटर्न मेमो फिर्यादी संस्थेस दि. 19 / 04 / 2026 इ. रोजी मिळालेला आहे. अशाप्रकारे अनादरीत झाल्याने फिर्यादी संस्थेस मानसीक धक्काच बसला आहे.

5. सदरील धनादेश नाकारले जाण्यामागे आरोपीचा अप्रामाणीकपणा व फिर्यादी संस्थेस फसवणेचा दुष्ट हेतू स्पष्ट दिसत आहे. आरोपीने सदरचे कृत्य हेतूपुरस्सर केले आहे. आरोपी याला सदरचा धनादेश फिर्यादी संस्थेस देत असताना संपूर्ण कल्पना व जाणीव होती की, खात्यामध्ये पुरेशी रक्कम नाही, त्यामुळे सदरचा धनादेश निश्चितच नाकारला जाईल. सदरचे कृतीतून आरोपीने फिर्यादी संस्थेची जाणीवपूर्वक फसवणूक केली आहे. सदरील प्रमाणे धनादेश देउन आरोपीने दि निगोशीएबल इंन्स्ट्रुमेंट ॲक्टचे कलम 138 सह कलम 142 प्रमाणे गंभीर गुन्हा केला आहे.

6. फिर्यादी संस्थेकडे सदर धनादेश न वटता दि. 19 / 04 / 2026 इ रोजी परत आले नंतर फिर्यादी संस्थेने वकीलामार्फत दि. 20 / 04 / 2026 इ रोजी रजि. पोष्टाने आरोपीस कायदेशीर नोटीस पाठविली आहे. तसेच सदरची नोटीस आरोपीस मिळालेपासून पंधरा दिवसांचे आत धनादेशवरील रक्कम फिर्यादी संस्थेस अदा करणेविषयी कळविले. सदरची नोटीस आरोपीस दि. 22 / 04 / 2026 रोजी मिळालेली

Assistant Superintendent.
Civil Court, Peth Vadgaon.

आहे. त्यानंतर आरोपीने पंधरा दिवसात म्हणजे दि. 07/05/2026 इ रोजी पर्यंत धनादेशवरील रक्कम फिर्यादी संस्थेस अदा करणे आवश्यक होते. तथापी सदर धनादेश वरील रक्कम दि 07/05/2026 इ रोजी पर्यंत आरोपीने फिर्यादी संस्थेस अदा केली नाही. त्यामुळे आरोपीने दि निगोशिएबल इंस्ट्रूमेंट ॲक्टचे कलम 138 सह कलम 142 प्रमाणे गंभीर गुन्हा केला आहे. त्यामूळे फिर्यादीस फिर्याद दाखल करणे भाग पडले आहे.

7. सदरची फिर्याद ही 07/05/2026 इ रोजी पासुन 1 महीन्याचे आत दाखल केली असून ती मुदतीत आहे.

8. सदर फिर्यादीस योग्य तो स्टॅम्प लावला आहे.

9. <u>फिर्यादीस कारण</u> – आरोपीने दिलेला धनादेश न वटता परत आला तेव्हा व दि. 20/04/2026 इ रोजी वकिलामार्फत आरोपीस रजि पोष्टाने धनादेश मधील रक्कम फिर्यादी संस्थेस अदा करणे विषयी कायदेशीर नोटीसीने कळविले असता आरोपीने नोटीस मिळाले पासून पंधरा दिवसाचे आत सदरची रक्कम फिर्यादी संस्थेस अदा करणे बंधनकारक होते. परंतू आरोपीने तसे केले नाही त्यावेळी व वेळोवेळी फिर्याद दाखल करणेस कारण घडले आहे.

10. यातील फिर्यादी संस्थेचे सावर्डे, ता. हातकणंगले, येथे आर्थिक व्यवहार आहेत. त्याचप्रमाणे आरोपीने फिर्यादी संस्थेस मे. कोर्टाचे स्थलसिमेत धनादेश दिलेला असून सदर धनादेश न वटता मे. कोर्टाचे स्थलसिमेतच फिर्यादी संस्थेस परत मिळाला आहे. आरोपीने फिर्यादी संस्थेशी आर्थिक व्यवहार हे मे. कोर्टाचे स्थलसिमेत केलेले आहेत. या कारणास्तव प्रस्तूतची फिर्याद चालविण्याचा व अंतिम निकाल देणेचा अधिकार मे. कोर्टास आहे.

11. यातील आरोपी विरुद्ध सदर धनादेश बाबत अन्य कोणत्याही न्यायालयात दिवाणी दावा अगर फौजदारी फिर्याद दाखल केलेली नाही अथवा नव्हती.

Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon.

६

12. <u>सबब फिर्यादी संस्थेची नम्र विनंती की ,</u>

**अ)** यातील आरोपी विरुद्ध दि निगोशिएबल इंस्ट्रुमेंट ॲक्ट 1881 चे कलम 138 सह 142 प्रमाणे कायदेशीर कारवाई करुन कडक शासन करावे. तसेच फिर्यादीस सी. आर. पी. सी. कलम 357 प्रमाणे धनादेश मधील रक्कमेच्या दुप्पट दंड करणेविषयी आदेश व्हावा.

**ब)** सदरच्या फिर्यादीची मे. न्यायालयाने दखल घेवून या आरोपी विरुद्ध वर नमूद पत्यावर प्रोसेस इश्यू करावी.

**क)** इतर योग्य ते न्यायाचे आदेश मे. न्यायालयाने फिर्यादी संस्थेचे बाजूने न्यायाचे दृष्टीने करावेत.

**ड)** जरुर तर फिर्याद दुरुस्तीस परवानगी असावी.

येणेप्रमाणे फिर्याद असे.

सोबत वकिलपत्र, कागद यादी, यादीप्रमाणे कागद व आरोपीकरिता फिर्यादीची प्रत असे कागद जोडले आहेत.

**पेठ वडगांव**

**दि.25/05/2026**

**फिर्यादी तर्फे साक्षीदार व पुरावा**

1 फिर्यादी स्वतः व आवश्यक वाटल्यास फिर्यादी संस्थेतील अन्य संबंधित कर्मचारी

2 भारतीय स्टेट बॅंक शाखा हातकणंगले तर्फे संबंधित अधिकारी व क्लार्क.

3. आर बी एल् बॅंक शाखा पेठवडगांव तर्फे संबंधित अधिकारी व क्लार्क.

4. संबंधित पोस्टमन

5. मे. कोर्टाचे परवानगीने जरुर पडलेस इतर अन्य साक्षीदार

फिर्यादीतर्फे दाखल करणार

ॲड. अश्विनी सोळांकूरे–हुकेरी

**सिनिअर मॅनेजर**
**आदर्श ग्रामीण सहकारी पत संस्था मर्या.सावर्डे**
**ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर**

Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon.

## ॲफिडेव्हिट

मी फिर्यादी संस्थेतर्फे मॅनेजर श्री.शहाजी बाबासो जाधव – मगदुम, व व 51, धंदा – नोकरी, रा. सावर्डे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर शपथेवर कथन करतो की, वरील प्रमाणे संपूर्ण मजकूर माझे माहीती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले ॲफिडेव्हिट आज मुा वडगांव

दि.25/05/2026

ॲफिडेव्हिट करणार

सिनिअर मॅनेजर
आदर्श ग्रामीण सहकारी पत संस्था मर्या.सावर्डे
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

## प्रतिज्ञा

मी फिर्यादी संस्थेतर्फे मॅनेजर श्री.शहाजी बाबासो जाधव – मगदुम, व व 51, धंदा – नोकरी, रा. सावर्डे,, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील ॲफिडेव्हिटमधील संपूर्ण मजकूर माझे माहीती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मुा वडगांव

दि.25/05/2026

प्रतिज्ञा करणार

Drafted & pleaded by
Adv. Ashwini C. Solankure

सिनिअर मॅनेजर
आदर्श ग्रामीण सहकारी पत संस्था मर्या.सावर्डे
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

Solemnly Affirmed before me by
S. Shahaji Babasao Jadhav Magdum. Age 51 yr
r. Savarde who is Occ.: service
identified by Sau. A. C. Solankure Adv
............whom I know personally
Dated 25/05/2026

Assistant Superintendent